|| सद्गुरुनाथा तव शरणम् ||

## गुरुतत्व प्रदीप, आयोजित

# लक्ष भोजन सहितम् सिद्ध ग्रंथ
# १००८ श्री गुरुचरित्र सारामृत पारायण,
# श्री गुरुचरित्र कथामृत व नाम भक्ती सोहळा



द्राँ
दत्तात्रेयाय
नमः



श्री गुरुदेव दत्त



श्री गुरुदेव दत्त



द्राँ
दत्तात्रेयाय
नमः



**• प्रारंभ •**
गुरुवार, २५ डिसेंबर २०२५

**• सांगता •**
शुक्रवार, २ जानेवारी २०२६

## माहिती व निमंत्रण पत्रिका

प्रति श्री. / सौ. ______________________________

______________________________

॥ ॐ ॥

या विश्वातील सर्व सद्गुरुंना सविनय सादर वंदन व सर्व गुरुपीठातील गुरु बंधु व भगिनींना श्री गुरुदेव दत्त...

ज्या क्षणाची आपण सारे दत्तभक्त आतुरतेने वाट पहात होतो, तो भाग्याचा क्षण अनुभवण्यासाठी आपण सारे सिद्ध होऊया

श्री नरहरी दत्ताची लीला अपार ।
लिहुन घेतले गुरुचरित्र सार ।
श्री दासगणुंसी करोनी सिद्ध ।
नामधारक योजला गुरुतत्व प्रदीप ।
त्रिकालज्ञ श्री नरहरी दत्त ।
कली कालाचे करुनी आकलन ।
ग्रंथ पोहोचण्या जनमानसात ।
नामधारका योजिले करण्या आयोजन ।

श्री स्वामी महाराजांच्या आदेशाने आजवर श्रीगुरुचरित्र सारामृत ग्रंथाची पारायणे व त्याद्वारे गुरुतत्व बोधामृताचा वसा जनमानसात पोहोचवण्याचे जे कार्य पूर्ण झाले त्याचा जणू काही दस्ताऐवजच सादर करण्यासाठी श्री स्वामी महाराजांनी ९ व्या पारायणाचे आयोजन श्रीक्षेत्र गाणगापूर येथे करण्यास सांगितले असावे असे वाटते.

गंधर्वपुरीचे महीमान ।
वर्णिले गुरुचरित्री अपार ।
अष्टतीर्थ भिक्षा महात्म्य
साधना करण्या क्षेत्र महान ।

श्रीक्षेत्र गाणगापूर येथे अष्टतीर्थ स्नान महात्म्य असून यातील प्रत्येक तीर्थाच्या स्नानाने माणसास विविध प्रकारचे लाभ हे निःसंशयपणे होतात याची प्रचिती आजवर लाखो भाविकांनी घेतली आहे.

गाणगापूर या क्षेत्री जप, तप, पुरश्चरण, ग्रंथवाचन यातून मिळणारे पुण्य इतर स्थानापेक्षा या स्थानी दशपटीने साधकास अधिक मिळते.

श्री गुरु दत्तात्रेयांना वाढलेल्या भिक्षेने दारिद्र्य नाश होऊन निःसंशयपणे

ऐश्वर्य वृद्धी प्राप्त होते. करिता या क्षेत्री हजारो भाविक दत्तगुरुंना भिक्षा वाढण्याकरिता रोज येत असतात.

वरील सर्व बाबींचा विचार केल्यावर श्री गुरुंची आपल्यावर किती असिम कृपा आहे हे लक्षात येते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने आपल्या हातुन श्रीक्षेत्र गाणगापूर येथे जप, तप, ग्रंथवाचन त्यासहित भिक्षारुपाने लक्षभोजन या गोष्टी येथे करावयाच्या असून श्रीगुरुचरित्रात मुख्यत्वे वर्णिलेला गुरुतत्व बोधाचा प्रदीप हजारो भाविकांच्या अंतरंगात चेतवून लाखो भाविकांच्या अंतरंगात परावर्तित करावयाचा आहे. ज्यायोगे श्री स्वामी महाराजांचे निस्सिम पाईक होण्याचे परम सौभाग्य याद्वारे आपणास लाभणार आहे.

करते करविते नरहरी दत्त ।
गुरुतत्व प्रदीप निमीत्य येथ ।
गुरुतत्वाचा लावण्या प्रदीप ।
गंधर्वपूरी येतील लाखोनी भक्त ।

या कार्यक्रमाच्या निमीत्याने श्री स्वामी महाराजांच्या आज्ञेने व त्यांच्या समेत दि. २६/१०/२०२५ ते २०/११/२०२५ या कालावधीत श्रीक्षेत्र कारंजा दत्त ते श्रीक्षेत्र गाणगापूर अशा भव्य पालखी रथयात्रा सोहळयाचे आयोजन केले आहे. खरे तर हा पालखी रथयात्रा सोहळा म्हणजे श्रीक्षेत्र गाणगापूर येथे होणाऱ्या कार्यक्रमाचा एक प्रकारे सांगावाच आहे असे वाटते. श्री स्वामींची लीला अगाध असून त्याचा पार लागणे कठीण आहे.

श्री स्वामी महाराजांच्या स्वयं इच्छेने होणाऱ्या वरील सर्व कार्यक्रमात आपण सर्वांनी अवश्य उपस्थित रहावे.

गुरुतत्व प्रदीप या आपल्या परिवाराच्या कार्याचा लेखा - जोखा तपासून श्री स्वामी महाराज पुढील कार्याची दिशा आपणास गाणगापूर येथे निःसंशपणे दाखवतील असे वाटते. तोपर्यंत आपणा सर्वांना श्री स्वामींचे अपूर्व असे हे कार्य अविरतपणे करावे लागेल व दिशा दाखवल्यावर सहस्त्र पट वेगाने हे कार्य दशोदिशी न्यावे लागेल. चला तर या श्री स्वामींच्या महान कार्याकरिता आपण सारे सिद्ध होऊ या.

।। श्री गुरुदेव दत्त ।।

।। श्री गुरुदेव दत्त ।।

# वाचक व सेवेकरी सहभाग

दत्तस्वरुप वाचक व सेवेकऱ्यांना सविनय सादर वंदन,

श्री स्वामी महाराजांच्या आदेशानुसार आपल्या परिवाराच्या वतीने श्री क्षेत्र गाणगापूर येथे जे ईश्वरीय कार्य करण्याचे योजिले आहे, त्याकरिता आपल्या सगळयांनाच कार्य-सिद्धीकरिता नियमावली, दिशादर्शक सूचना व आत्मउद्बोधक जीवनमुल्ये निश्चीत करावी लागतील.

निश्चीत केलेली आदर्श नियमावली, मार्गदर्शक सूचना व आत्मोद्धारक जीवनमुल्ये आपण आपल्या वर्तनात प्रामाणिकपणे अंमलात आणल्यास हे ईश्वरीय कार्य निःसंशयपणे सिद्धीस जाईल.

सुयोग्य गुरुभक्ती होण्याकरिता नियमावली, सूचना व जीवनमुल्ये आत्मसात करुन या ईश्वरीय कार्याकरिता आपण सारे सिद्ध होऊया.

## मार्गदर्शक सूचना :-

१. दि. २ जानेवारी ते ३० मे २०२५ या कालावधीत आपणास वाचक अथवा वाचक सेवेकरी किंवा सेवेकरी म्हणून सहभागी होण्यासाठी नोंदणी करणे क्रमप्राप्त आहे.

२. आजपर्यंत विविध गावांत झालेल्या कार्यक्रमातील वाचक व सेवेकरी यांची होणारी नावनोंदणी व प्रत्यक्षात येणारे वाचक व सेवेकरी यामध्ये बरीच तफावत आढळून आल्याकारणाने श्रीक्षेत्र गाणगापूर येथे होणाऱ्या कार्यक्रमातील निवास व्यवस्थेवर श्री स्वामी महाराजांच्या द्रव्याचा अपव्यय टाळण्याच्या हेतुने वाचक व सेवेकरी यांच्याकरिता पूर्ण परतावा स्वरुपात रु. १०००/- नावनोंदणी शुल्क नक्की केले आहे.

नावनोंदणी केलेले वाचक व सेवेकरी कार्यक्रमाकरिता श्रीक्षेत्र गाणगापूर येथे आल्यावर त्यांना आपला परतावा परत घेता येईल व काही अपरिहार्य कारणाने ज्यांचे येणे होणार नाही त्यांची परताव्याची रक्कम श्री स्वामी महाराजांच्या चरणी अर्पण केल्या जाईल. तरी आपण सर्वांनी दयार्द्र होऊन, अडचण लक्षात घेऊन मोलाचे सहकार्य करावे.

३. या ईश्वरीय कार्याकरिता श्रीक्षेत्र गाणगापूर येथे येण्याचा व जाण्याचा प्रवास

खर्च वाचक व सेवेकरी यांनी स्वत:चा स्वत: करावयाचा आहे.

४. वाचक व सेवेकरी यांनी श्रीक्षेत्र गाणगापूर येथे येताना आणावयाचे सामान

नित्याचे कपडे, छोटी सतरंजी, बेडशीट, पांघरुण, हवेची उशी, बॅटरी, आवश्यक व नियमीत असलेली औषधी, पाण्याची बाटली, ओडोमासची बारीक ट्युब, आधार कार्ड व त्याची एक छायांकित प्रत, एक शबनम अथवा सॅक, स्वेटर, मफलर/टोपी, धुणे वाळत घालावयाची दोरी, कुलूप.

सामानाच्या बॅगा जास्त होणार नाहीत याची काळजी घ्यावी, ज्यायोगे आपणास प्रवास व निवास व्यवस्थेत अडचणीचे ठरणार नाही.

५. आपणास उपलब्ध करुन देण्यात आलेली निवास व्यवस्था कार्यस्थळा पासून दूर असल्यास कार्यस्थळी येण्याचे व जाण्याचे नियोजन आपले आपण करुन आपल्या परिवारास उपकृत करावे.

६. सामुदायिक निवास व्यवस्थेमध्ये उपलब्ध असलेला कॉट अथवा कमोड याचा वापर गरजेनुसार आपल्या सोबतच्या गुरुभगिनी / गुरुबंधु यांच्याकरिता उपलब्ध करुन देण्याचे औदार्य दाखवून श्री दत्तकृपेस पात्र व्हावे.

७. सर्व वाचक व सेवेकरी यांनी आपापले मोबाईल, चार्जर, मौल्यवान वस्तु इ. आपण आपल्या जबाबदारीवर सांभाळाव्यात, वस्तु गहाळ झाल्यास आपला परिवार यास जबाबदार राहणार नाही.

८. सर्व वाचक व सर्व सेवेकरी यांची स्वत:च्या जीवीत्वाची जबाबदारी स्वत:वर राहील. तसेच येताना आपली सोबत आणलेली नित्याची औषधे वेळच्या वेळेवर घेऊन स्वत:ची काळजी स्वत: व्यवस्थीत घ्यावी.

९. आपल्या कार्यक्रमाची सुरुवात दि. २५ डिसेंबर २०२५ तारखेस होणार असल्याकारणाने सर्वांनी दि. २४ डिसेंबर २०२५ उशीरात उशीर दु. ५ पर्यंत पोहोचणे अनिवार्य असून २५ डिसेंबरला सकाळी ५.३० पासून "**श्रींचे अष्टतीर्थ शाही स्नान सोहळयास**" सुरुवात होणार असून हा सोहळा दुपारी मठामध्ये श्रींच्या माध्यान्ह आरतीकरिता पोहोचेल व तेथेच आपल्या सगळयांना भिक्षान्न प्रसाद घ्यावयाचा आहे. तरी ज्या वाचक व सेवेकरी भक्तांना या सोहळयास शारिरीक त्रासाने सहभागी होता येत नसेल त्यांनी माध्यान्ह आरतीकरिता गणवेषात मठामध्ये उपस्थित रहावे.

१०. ज्या दत्तस्वरुप वाचकांना शारिरीक व्याधीमुळे स्वतंत्र निवास व्यवस्था लागत असल्यास अशा दत्तस्वरुप वाचकांनी आपल्या स्वतःच्या सोईनुसार आपली निवास व्यवस्था आपली आपण अधिरक्षीत करुन ठेवावी. अशा दत्तस्वरुप वाचकांनाही आपल्या नावाची नोंदणी करणे अनिवार्य असून कार्यक्रमास आल्यावर आपल्या नावनोंदणीचा परतावा आपणास तेथे मिळेल.

११. ज्या भाविकांना वेळेच्या कारणाअभावी या भक्तीसोहळयास पूर्ण दिवस उपस्थित राहता येणार नाही अशा भाविकांनी आपल्या वेळेच्या नियोजनानुसार या आपल्या परिवाराच्या कार्यक्रमात यावे. येथे आल्यावर निवास व्यवस्था आपली आपण करुन घेऊन आपल्या परिवारास उपकृत करावे व कार्यस्थळी भोजन प्रसाद व कार्यक्रमाचा आनंद घेण्यास आवर्जुन उपस्थित रहावे.

१२. कार्यमंडपामध्ये असताना आपण आपला मोबाईल सायलेंट मोडवर ठेवावा.

१३. कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या वाचक व सेवेकरी या सर्वांकरिता आवश्यकतेनुसार काही सूचना आपणास देण्यात येतील. सर्व सूचनांचे पालन करुन आपण सारे या भक्तीसोहळयाकरिता सज्ज होऊया.

## आदर्श नियमावली :-

१. वाचक / सेवेकरी महिलांकरिता अनुक्रमे भगव्या रंगाची साडी व चॉकलेटी रंगाचे ब्लाऊज तसेच भगव्या रंगाचा कुर्ता, चॉकलेटी रंगाची सलवार व चॉकलेटी रंगाची ओढणी / चॉकलेटी रंगाचे जॅकेट या पोषाखात आपण असणे अनिवार्य आहे.

२. वाचक / सेवेकरी पुरुषांकरिता पँट / पायजमा / लुंगी / धोतर, बंडी/नेहरु शर्ट, डोक्यावर भगवी टोपी व गळयात भगवे उपरणे वापरणे अनिवार्य आहे.

३. या कार्यक्रमात आपल्या परिवारातर्फे वाचक व सेवेकरी यांच्याकरिता एक वेळचा नाष्टा व दोन वेळचे जेवण (संध्याकाळच्या जेवणात भाताचा प्रकार) याची व्यवस्था केली असून चहा व कॉफीची व्यवस्था आपली आपण आपल्या सवयीनुसार करुन घ्यावयाची आहे.

४. सर्व वाचक, सेवेकऱ्यांनी प्रभात आरती, माध्यान्ह आरती, सायं आरती, अल्पोपहार, माध्यान्ह भोजन, सायं भोजन, श्री गुरुगीता उपहार, नित्यपाठ, ग्रंथ

वाचन या गोष्टींकरिता आपण कार्यस्थळी वेळेवर हजर असणे अनिवार्य आहे.

तसेच या कार्यक्रमाअंतर्गत रात्री ९ ते १० या वेळेत होणाऱ्या "**सहस्त्रदीप दिव्य दर्शन नाम जप सेवा**" या विशेष सेवेमध्ये सर्व विद्वत, वाचक व सेवेकरी सर्वांनी सहभागी होणे आवश्यक आहे.

## आत्मउद्बोधक जीवनमुल्ये :-

१. हा कार्यक्रम कुण्या एका व्यक्तीचा नसून हा कार्यक्रम आपल्या सर्वांचा आहे ही भावना सर्वांच्या मनात सतत प्रेरित असावी.

२. या कार्यक्रमात आपल्या बुद्धी कौशल्यानुरुप ज्या समितीचे कार्य करण्याची संधी मिळेल त्यात आपण आपले बुद्धीकौशल्य पणास लावून समितीच्या निर्देश केलेल्या कार्यानुरुप सुयोग्य पद्धतीने कार्य पार पाडावे.

३. हे कार्य करत असताना द्वेष, असुया, मत्सर या गोष्टी कधीही मनात येऊ नयेत. आपण सेवा करत असताना या गोष्टी मनात येणे म्हणजे आपले सेवेपेक्षा इतर बाबीतच जास्त लक्ष असल्याचे सिद्ध करते.

४. कुठल्याही समितीकडे बघताना सेवकाच्या मनात सम्यक दृष्टी असावी. सेवा ही फक्त सेवाच असते व सेवेतून साधकाच्या जीवनास एक नवीन आकार प्राप्त होतो.

५. आपण आपल्या संसारिक जबाबदाऱ्या नोकरी - व्यवसाय हे सांभाळून आपल्या दैनंदीन धकाधकीच्या आयुष्यातील काही वेळ खर्च करणे गरजेचे आहे. खर्च केलेल्या वेळेचे मुल्यमापन पैशाच्या अथवा मान सन्मानाच्या रुपात गृहीत धरणे योग्य होणार नाही. या सेवेचे फळ आपल्या भावी पिढीकरता त्यांच्या आयुष्यात नक्कीच मोलाचे कार्य करेल.

६. जसे की, आपल्याला चालून आलेली ही सेवेची संधी जशी आपल्या वाडवडिलांच्या पुण्य संचयाने आपल्याला प्राप्त झाली, त्याचप्रमाणे हाच गुरुसेवेचा वारसा आपल्या भावी पिढीतही प्रविष्ट होईल.

७. ईश्वरीय कार्य करत असताना आपल्या मनात मी पणाचा अहंकार उत्पन्न होणे हे आपल्या करिता अहितकारक आहे. कार्य करत असताना असे प्रसंग मुद्दाम समोर येतात कारण ही सर्व सद्गुरुंची लिला असते पण या परिक्षेत जो पास झाला त्याची दखल इतिहासालाही घ्यावी लागते.

८. या कार्यक्रमाचा मुळ हेतु गुरुतत्व बोधाची ज्ञानगंगा घराघरात पोहोचवणे व याद्वारे गुरुतत्व प्रदीप या आपल्या परिवाराचा कुटूंब विस्तार करणे हा आहे.

हा उदात्त हेतु ध्यानी धरून प्रत्येक सेवेकऱ्याने या कार्यक्रमाकरिता येणाऱ्या व कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या सर्व भाविकांशी त्या दृष्टीने आपले वर्तन ठेवणे गरजेचे आहे.

या गंधर्वपूर नगरीमध्ये महाराष्ट्रातील जवळपास सर्व जिल्ह्यातून येणारे भाविक तसेच कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा, गोवा, गुजरात व मध्यप्रदेश अनुक्रमे या सर्व ठिकाणाहून येणारे भाविक हे आपल्या कुटूंबाचे सदस्य या रुपात या कार्यक्रमात आपली उपस्थिती लावणार आहेत. खरेतर या योगे या कार्यक्रमात सहभागी असणाऱ्या प्रत्येकास श्री स्वामी महाराजांच्या कृपेने एकाच वेळी एवढे सारे आप्त भेटण्याचे एक आगळे वेगळे परम सौभाग्य प्राप्त होणार आहे. त्याकरिता आपला सेवाभाव विनम्र ठेवून सेवेकरिता तत्पर रहाणे गरजेचे आहे.

९. गुरुतत्वाच्या एकसुत्री धाग्यामध्ये हजारो लाखो गुरुपीठातील साधकांची अपुर्व अशी मालिका श्री गुरुदत्तात्रेयांच्या चरणी अर्पण करण्याची ही जणूकाही आपल्याला पर्वणीच लाभली आहे. त्यादृष्टीने प्रत्येक साधकाने या कार्यक्रमाकरिता तळमळीने झटणे नितांत गरजेचे आहे.

१०. या कार्याच्या पूर्ततेकरीता कार्यारंभ होण्याच्या आधी, कार्यकालात, कार्य पश्चात वेगवेगळया जबाबदाऱ्या आपल्याला सगळयांना मिळून पार पाडणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने आपण उस्फुर्तपणे कार्यारंभ, कार्यकाळ, कार्य पश्चात या सेवेकरिता आपण आपल्या वेळेच्या नियोजनानुसार आपली अनुमती कळवून आपल्या परिवारास उपकृत करावे.

११. ईश्वरीय कार्य करत असताना कुठल्याही पदाची लालसा कुणाच्याही मनात असणे योग्य होणार नाही. कार्य करत असताना आपण ज्या पदावर आहोत ते पद आपल्या वैयक्तिक स्वार्थाकरता नसून ईश्वरीय कार्य करण्याकरता आपल्याला मिळालेली ही संधी असून त्या संधीचे सोने करण्याचा कसोशीने प्रयत्न करावा. कुठल्याही भाविकाशी आपले वर्तन सुयोग्य पद्धतीचे असावे. आपल्या बोलण्याने कुणीही दुखावल्या जाईल अशा प्रकारचे बोलणे सर्वांनी टाळणे हितावह ठरेल.

हे कार्य करत असताना आपापसातील द्वेष बाजूस ठेवून एक दिलाने व एक विचाराने हे ईश्वरीय कार्य सिद्धीस नेता येईल.

॥ श्री ॥

# सिद्ध ग्रंथ पारायणे

## श्री गुरुचरित्र सारामृत - सामुदायिक पारायण

चिंतामणी विजय, श्री गुरुचरित्र, ऋग्वेद संहीता, यजुर्वेद संहीता, अथर्ववेद संहीता, सामवेद संहीता, तुकाराम गाथा पारायण, ज्ञानेश्वरी, दासबोध, देवी भागवत, शिवलीलामृत, श्रीपाद श्रीवल्लभ चरितामृत, दत्तमहात्म्य, हरि विजय, राम विजय, नवनाथ भक्तिसार, स्वामी लीलामृत, साई सच्चरित्र, गजानन विजय.

## एक दिवसीय पारायण मंच

सप्तशिती श्री गुरुचरित्र, वासुदेव सप्तशिती, मल्हारी सप्तशिती, तुकामाई चरित्र, श्री सखाराम चरित्रामृत, श्री अखंडानंदामृत, शंकर गीता, संक्षीप्त गुरुचरित्र.

या कार्यक्रमाची माहिती आपण आपल्या नातेवाईक, मित्र परिवार यांच्यापर्यंत पोहोचवावी. तसेच रथयात्रा मार्ग तालीकेतील ज्या गावांमध्ये प्रत्यक्ष - अप्रत्यक्षपणे आपला संपर्क असेल तिथपर्यंत माहिती पोहोचवून त्यांच्याशी आपल्या परिवाराचा संपर्क साधून दिल्यास त्या गावचे नियोजन करणे आपणास सोपे होईल.

या ईश्वरीय कार्यास हातभार लावून श्री दत्तकृपेस पात्र व्हावे, ही विनंती.

॥ श्री ॥

दि. २५/१२/२०२५ रोजी पहाटे ५.३० वा कार्यस्थळापासून
''पालखी शाही स्नान सोहळ्यास'' आरंभ होईल.

# दैनंदिन रुपरेषा

| | | | |
|---|---|---|---|
| मंगल प्रभात | स. ५ ते ५.३० | प्रभात भक्ती वंदना | स. ५.३० ते ६ |
| महाअभिषेकम् | स. ६ ते ८ | आरती, बालभोग | स. ८ ते ८.१५ |
| महारुद्रअभिषेक | स.८.१५ ते दु.१२ | सेवानंद संगीत सभा | स.८.१५ ते ९.१५ |
| अल्पोपहार | स.८.१५ ते ९.१५ | सिद्ध ग्रंथ पारायण | स. ९ ते दु. १२ |
| सहस्त्रपाठ सेवा | स. ९ ते दु. १२ - श्री दत्तमाला मंत्र, जयलाभादी स्तोत्र, लक्ष्मीनारायण स्तोत्र | | |
| दुर्गा सप्तशिती पाठ | स. ९ ते दु. १२ | श्री गुरुगीता उपहार | स.९.३० ते १०.१५ |
| नित्यपाठ, श्री गुरुचरित्र सारामृत पारायण, भिक्षा नैवेद्य, आरती | | | स.१०.३० ते दु.१२.३० |
| मंगलध्वनी निनाद | दु. १२.३० ते १ | माध्यान्न भोजन प्रसाद | दु.१२.३० ते २ |
| सेवानंद संगीत सभा | दु. १ ते २ | दुर्गा सप्तशिती पाठ | दु.२ ते सायं.६ |
| विविध कला गुण दर्शन | दु. २ ते २.४५ | श्री गुरुचरित्र कथामृत व आरती | दु. ३ ते ६ |
| श्रीसुक्त अभिषेक, कुंकूमार्चन, श्री नर्मदा पुजन, कुमारिका पुजन | | | दु. ४ ते ५.३० |
| सायं स्वर चंद्रिका | सायं.६ ते ६.३० | सामुहिक विष्णुसहस्त्रनाम पाठ | सा.६.३० ते ६.४५ |
| शांतीपाठ, रामरक्षा, हरिपाठ | सा. ६.४५ ते ७.३० | सायंभोज व संगम सेवेकरी भोज | सा.७.३० ते ८.३० |
| मंत्रजागर | रात्रौ ८.३० ते ९ | सहस्त्रदिप दिव्य दर्शन नाम जप सेवा | रात्रौ ९ ते १० |
| हरिजागर - रात्रौ १०.३० ते स. ४.३० | | | |
| शुक्रवार, मंगळवार - देवीचा गोंधळ, सोमवार - खंडोबाचा जागर | | | |
| शनिवार, रविवार, बुधवार - भजन, गुरुवार - पुर्णारती भजन व दत्त पंचपदी | | | |

# कार्यक्रमातील सेवा (गाणगापूर)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रधान यजमान | २१,००,००० | २२. | कथा अंतर्गत श्री दत्तजन्मोत्सव सेवा | २१,००० |
| २. | अन्नदान प्रधान यजमान | ११,००,००० | २३. | नित्य बालभोग व अल्पोपहार सेवा | १६,००० |
| ३. | अतिरुद्र प्रधान यजमान | ५,००,००० | २४. | शत ब्राह्मण भोजन सेवा | १६,००० |
| ४. | श्री गुरुचरित्र कथामृत यजमान | २,५१,००० | २५. | एकादश पारायण श्रेय सेवा (११ पारायण) | १६,००० |
| ५. | श्रींचे शाही स्नान व पालखी सोहळा यजमान | २,०१,००० | २६. | सहस्त्रदिप दर्शन सेवा | ११,००० |
| ६. | पाठात्मक सहस्त्रचंडी प्रधान यजमान | २,००,००० | २७. | फुलांची होळी | ११,००० |
| ७. | नित्य माधुकरी सेवा (मठ व संगम) | १,५१,००० | २८. | पेयजल सेवा (१ दिवसीय) भिक्षास्थळी (बॉटल) | ११,००० |
| ८. | लघु विष्णू (१२ पवमानी) प्रधान यजमान | १,११,००० | २९. | पेयजल सेवा (१ दिवसीय) कार्यस्थळी | ५,००० |
| ९. | सौभाग्य अलंकार प्रदान सेवा (स्वहस्ते) (पीस, ओटी, नारळ, बांगड्या, गरसोळी, हळदी कुंकू) | १,११,००० | ३०. | पुष्पार्चन सेवा | ५,००० |
| १०. | कार्यस्थळी नित्य अन्नदान सेवा | १,००,००० | ३१. | तांबूल प्रदान सेवा | ५,००० |
| ११. | महारुद्र प्रधान यजमान | ६१,००० | ३२. | पीडा बाधा निवारणार्थ श्री दत्तमाला मंत्र (१६०० पाठ) सेवा | ४,१०० |
| १२. | पेयजल सेवा प्रधान यजमान | ६१,००० | ३३. | इष्टकामना फलपूर्तीदायक जयलाभादीकार स्तोत्र (१६०० पाठ) सेवा | ४,१०० |
| १३. | अष्टोत्तर शत पारायण श्रेय सेवा (१०८ पारायण) | ६१,००० | | | |
| १४. | श्री विष्णु सहस्त्रनाम (१००० पाठ) प्रधान यजमान | ५१,००० | ३४. | अखंड वैभव प्राप्ती सिध्यर्थ श्री लक्ष्मी नारायण स्तोत्र (१६०० पाठ) सेवा | ४,१०० |
| १५. | सायं अन्नदान सेवा (कार्यस्थळ व संगम) | ५१,००० | ३५. | राजोपचार लघुरुद्र अभिषेक | ३,१०० |
| १६. | पीडा बाधा निवारणार्थ श्री दत्तमाला मंत्र एकादश सहस्त्रपाठ सेवा | ३१,००० | ३६. | राजोपचार पवमानी अभिषेक | ३,१०० |
| | | | ३७. | पाठात्मक नवचंडी यजमान | ३,१०० |
| १७. | इष्टकामना फलपूर्तीदायक जयलाभादीकार स्तोत्र एकादश सहस्त्रपाठ सेवा | ३१,००० | ३८. | श्री नर्मदा पुजन व कुमारिका पुजन सेवा (९ कुमारिका) | ३,१०० |
| १८. | अखंड वैभव प्राप्ती सिध्यर्थ श्री लक्ष्मी नारायण स्तोत्र एकादश सहस्त्रपाठ सेवा | ३१,००० | ३९. | श्री सुक्त अभिषेक व कुंकूमार्चन सेवा (स्वहस्ते) श्री यंत्राची प्रतिमा प्रसाद रुपात मिळेल | २,१०० |
| १९. | एकविंशती पारायण श्रेय सेवा (२१ पारायण) | ३१,००० | ४०. | भिक्षान्न पात्र प्रदान सेवा | २,१०० |
| २०. | श्री गुरुचरित्र ग्रंथ तुला दानम् सेवा | ३१,००० | ४१. | १ पारायण श्रेय सेवा | १,६०० |
| २१. | पाठात्मक शतचंडी यजमान | २१,००० | ४२. | कथा पश्चात आरती व प्रसाद | १,१०० |

**✻ अधिक माहितीसाठी संपर्क ✻**

**मो. ७४१०१ ७५१८९, ९९२१९२५१८९ , ९४२०८४८१८९ , ९६२३१७७९९५**

## श्रीक्षेत्र कारंजा (दत्त) ते श्रीक्षेत्र गाणगापूर

## पालखी रथयात्रा मार्ग तालिका

| अ.क्र. | दिनांक, वार | गावे | मुक्काम | किमी |
|---|---|---|---|---|
| १ | २६/१०/२५ रविवार | कारंजा, मूर्तीजापुर, अकोला, शेगाव, खामगाव | खामगाव | १४२ |
| २ | २७/१०/२५ सोमवार | खामगाव, नांदुरा, मुक्ताईनगर, भुसावळ, जळगाव | जळगाव | १४० |
| ३ | २८/१०/२५ मंगळवार | जळगाव, अमळनेर, धुळे, मालेगाव, सटाणा | सटाणा | १९० |
| ४ | २९/१०/२५ बुधवार | सटाणा, देवळा, कळवण, वणी, दिंडोरी, त्र्यंबकेश्वर, तळेगाव ( अंजनेरी ) | तळेगाव ( अंजनेरी ) | १६७ |
| ५ | ३०/१०/२५ गुरुवार | तळेगाव ( अंजनेरी ), नाशिक | नाशिक | १९ |
| ६ | ३१/१०/२५ शुक्रवार | नाशिक, पिंपळगाव ( बसवंत ), लासलगाव, विंचुर, येवला, कोपरगाव, वैजापूर | वैजापूर | १४५ |
| ७ | ०१/११/२५ शनिवार | वैजापूर, गंगापूर, दत्त देवगड, नेवासा, शेवगाव, पैठण, बिडकीन, छ. संभाजीनगर | छ. संभाजीनगर | १९० |
| ८ | ०२/११/२५ रविवार ( एकादशी ) | छ. संभाजीनगर, करमाड, बदनापूर, जालना | जालना | ६० |
| ९ | ०३/११/२५ सोमवार | जालना, अंबड, गेवराई, बीड | बीड | १०२ |
| १० | ०४/११/२५ मंगळवार ( वैकुंठ चतुर्दशी ) | बीड, तेलगाव, माजलगाव, मंजरथ, पुरुषोत्तमपुरी, सृष्टी, परतूर, पाथरी, मानवत | मानवत | २०० |
| ११ | ०५/११/२५ बुधवार ( पौर्णिमा ) | मानवत, सेलू, मंठा, लोणार, रिसोड, वाशिम | वाशिम | १७९ |
| १२ | ०६/११/२५ गुरुवार | वाशिम, कन्हेरगाव, हिंगोली, औंढा, जिंतुर | जिंतुर | १२० |
| १३ | ०७/११/२५ शुक्रवार | जिंतुर, बोरी, झरी, परभणी, वसमत | वसमत | ९० |
| १४ | ०८/११/२५ शनिवार ( चतुर्थी ) | वसमत, असेगाव, नांदेड, भोकर | भोकर | ९० |
| १५ | ०९/११/२५ रविवार | भोकर, मुदखेड, गोरठा, पेठ उमरी, करखेली, धर्माबाद, बासर | बासर | १११ |
| १६ | १०/११/२५ सोमवार | बासर, कोंडलवाडी, बिलोली, कासराळी, नर्सी, गडगा, मुखेड, शिरुर ताजबन्द, लातूर | लातूर | १८८ |
| १७ | ११/११/२५ मंगळवार | लातूर, उदगीर, अहमदपूर, लोहा, पालम, गंगाखेड | गंगाखेड | १९२ |
| १८ | १२/११/२५ बुधवार | गंगाखेड, परळी, आंबेजोगाई, कळंब, धाराशिव, तुळजापूर | तुळजापूर | १८० |
| १९ | १३/११/२५ गुरुवार | तुळजापूर, बार्शी, भूम, परांडा, करमाळा, राशीन, शेडगाव | शेडगाव | १७५ |
| २० | १४/११/२५ शुक्रवार | शेडगाव, पेडगाव, श्रीगोंदा, अहिल्यानगर, शिरुर, खराडी/वाघोली | खराडी/वाघोली | १९० |
| २१ | १५/११/२५ शनिवार ( एकादशी ) ( आळंदी यात्रा ) | श्रीशंकर महाराज मठ, सारसबाग गणपती, कसबा गणपती, दगडूशेठ गणपती, दत्त मंदीर, वासुदेव निवास, सिंहगड रोड, माऊली आश्रम, धारेश्वर मंदीर, नांदेड सिटी, शिवणे, वारजे, म्हतोबा मंदीर, कोथरुड | कोथरुड | २३ |
| २२ | १६/११/२५ रविवार | कोथरुड, बाणेर, पिंपळे गुरव, चिंचवड, निगडी, देहू, आळंदी, नाशिक फाटा, शिरवळ | शिरवळ | १४३ |
| २३ | १७/११/२५ सोमवार | शिरवळ, सातारा, कराड, पलूस, औदुंबर | औदुंबर | १६० |
| २४ | १८/११/२५ मंगळवार | औदुंबर, आष्टा, पेठ वडगाव, कोल्हापूर, इचलकरंजी, शिरधोण, नरसोबावाडी, सांगली, तासगाव | तासगाव | १४५ |
| २५ | १९/११/२५ बुधवार | तासगाव, विटा, पिंगळी, गोंदवले, म्हसवड, माळशिरस, पंढरपूर | पंढरपूर | १९० |
| २६ | २०/११/२५ गुरुवार | पंढरपूर, मोहोळ, सोलापूर, अक्कलकोट, गाणगापूर | गाणगापूर | १७५ |
| | | | | ३७०६ |